# आधार !

संध्याकाळी साहित्यसंघात कवि चंडोलांच्या सत्कार सभेसाठी चिंतू जायला निघाला अन् चपला पायात घालत असताना त्याच्या कानावर अण्णाचं कुत्सित बोलणं पडलं.

'निघाली का स्वारी ? उकिरडे फुंकायला !'

चिंतूनं डोळ्यांच्या कोपऱ्यातून पाहिलं. पेपर हातात घेऊन आरामखुर्चीत बसलेले अण्णा त्याच्याकडेच बघत होते. चेहऱ्यावर नेहमीचीच हेटाळणी अन् नजरेत पुरेपूर उपरोध ! नजर वळवून तो बाहेर पडला.

'---अण्णांचं हे नेहमीचंच होतं. आपल्या मोठ्या भावासारखं प्रख्यात डॉक्टर, इंजिनिअर किंवा कमीत कमी प्राध्यापक होण्याऐवजी आपण इंटर होऊन साधी कारकुनी पत्करली तेव्हापासून त्यांच्या व्यावहारिक जगात आपली किंमत शून्य ठरली. आपण काव्य लिहिण्यासाठी हातात धरलेली लेखणी त्यांच्या मतानं हातात दारिद्र्याची झोळी धरण्यासारखं ठरलं.... हूं ! रुपयापैशाच्या मापानं माणसाच्या यशापयशाची मोजमाप करू पाहणाऱ्या अण्णांना आपलं महत्त्व काय कळणार ? त्यांच्या फुटपट्ट्याच वेगळ्या, व्यावहारिक....! बाहेर जग आपल्याबद्दल काय बोलतं ह्याची त्यांना काय कल्पना' ....? सध्या साहित्यात ज्याचं नाव गाजतं आहे अन् ज्यांना त्यांच्या साहित्यातील कामगिरीबद्दल पद्मश्री मिळाली म्हणून साहित्यसंघात आज सत्कार होणार आहे ते कविश्रेष्ठ चंडोलसुद्धा परवा आपल्याजवळ खाजगीत बोलून गेले की आपल्या प्रतिभाशाली लेखणीत सारं जग पेटवून देण्याचं सामर्थ्य आहे म्हणून ! आणि चारचौघातही ते असं बोलायला कमी करणार नाहीत - वेळ आल्यावर !'

आत्मगौरवाच्या झोतावर आरूढ होऊन चिंतूच्या मनाचा पतंग असा वरवर उंच जाऊ लागला. तेवढ्या उंचीवरून त्याला इतर माणसं खुजी वाटू लागली. अण्णांची त्याला कीव आली. त्यांच्या दृष्टीची मर्यादा त्याच्या लक्षात आली. शर्टची कॉलर ताठ करून, भांगातून बोटांचा कंगवा फिरवून केस अस्ताव्यस्त करीत, पाठीला पोक काढून तो डुलत डुलत चालू लागला - नवीनच जुळवत असलेल्या कवितेच्या काही ओळी मनात घोळवत.

संध्याकाळ आता रात्रीकडे झुकू लागली होती. मावळतीकडचा तांबडा प्रकाश आता काळवंडू लागला होता. आकाशात तुरळक चांदण्या आपलं

लाजरं बुजरं अस्तित्व दाखवू लागल्या होत्या. रस्त्यावरील ट्यूबलाईटस् पेटले होते. दोन्ही बाजूच्या दुकानांवरील निऑनसाइन्सच्या चित्रविचित्र जाहिराती आपला... रंगीबेरंगी प्रकाश रस्त्यावर फेकू लागल्या होत्या. रस्त्यावरील वर्दळीत अद्ययावत, भडक फॅशन्स केलेल्या स्त्री-पुरुषांची प्रामुख्यानं भर पडली होती. त्यांच्या संमिश्र कोलाहालात जाणाऱ्या येणाऱ्या मोटारींच्या निरनिराळ्या सूरातील हॉर्नची भर पडून रस्त्यावर एक प्रकारचं रंगीबेरंगी नि उत्साही वातावरण निर्माण झालं होतं. दुकानांतून विक्रिस मांडलेल्या वस्तूंचं झगमगीत प्रदर्शन सर्वांचं लक्ष वेधून घेत होतं, भुरळ घालत होतं.

ह्या सर्वांवर एक अलिप्त नजर फिरवीत चिंतू आपल्याच तंद्रीत चालला होता. एवढ्यात त्याच्या खांद्यावर मागून एका घवघवीत पंजाची थाप पडली अन् पाठोपाठ हास्याच्या गडगडाटातून शब्द ऐकू आले-

'काय कविराज ? म्हटलं लक्ष कुठाय ? बाकी आपण आपल्या त्या समाधीत असणार म्हणा ! तुम्हा साहित्यकांच्या भाषेत 'सविकल्प' की असंच काहीतरी म्हणतात ती ?'

चिंतूनं थांबून मागं वळून पाहिलं. सदानंद रामकृष्ण मुळे आपल्या दोनतीन मित्रांबरोबर पानाच्या ठेल्यासमोर उभा होता अन् चिंतूकडे बघत खिदळत होता. त्याचे मित्रही त्याला साथ देत होते.

चिंतू आता चिडला. काही झालं तरी सदानंद त्याचा शाळासोबती होता. शिवाय तो स्वत:ही एक उदयोन्मुख कथालेखक होता. तेव्हा त्यानं तरी आपली व्यथा समजून घ्यायला हवी होती. समकालीन साहित्यिक या नात्यानं सहानुभाव दाखवायला हवा होता. पण उलट तोही इतरांसारखा अशा खालच्या पातळीवरून त्याची टवाळी करीत होता..... त्याच्या, हास्याच्या उकळ्या फुटणाऱ्या गरगरीत पोटावर गुद्दे ठेवून द्यावे इतकी आत्यंतिक चीड चिंतूला आली नि तो ओरडला -

'सद्या !.... लेका, खिंकाळतोस काय घोड्यासारखा ? तू देखील एक उदयोन्मुख लेखक आहेस; विसरू नकोस !....

चिंतूचा पिवळट चेहरा रागानं अधिकच पिवळा पडला. सदानंद मुळे पुन्हा एकवार खदखदला. मग एकदम दोन्ही हात जोडून कृत्रिम विनयानं म्हणाला-

'छे: छे: ! कुठं आपण साऱ्या मानवतेला क्रांतीचा संदेश देणारे द्रष्टे कवि अन् कुठं आम्ही ! एक क्षुद्रकथा लेखक केवळ वाचकांचं स्वप्नरंजन

करणारे...... पलायनवादी !'

सदानंदचा तो कृत्रिम अभिनय पाहून त्याचं दोस्तमंडळ पुन्हा एकदा फिदफिदलं. चिंतूच्या मस्तकाच्या शिरा आता ताडताड उडू लागल्या. अनावर संतापानं त्याचा काटकुळा देह कापू लागला. बेभान होऊन तो त्या साऱ्यावर आग ओकू लागला--

'मग खोटं आहे काय ? आहातच तुम्ही पलायनवादी ! वास्तव जीवनापासून स्वत: दूर दूर पळणारे अन् वाचकांनाही भूल पाडणारे..... त्यांना खोट्या जगाची, आदर्शवादाची, मोहक कल्पनांची अफीम पाजणारे, पूर्वीच्या चिनी लोकांसारखं सुस्त, निष्क्रिय करून सोडणारे.... निव्वळ पैशाकरता, सवंग लोकप्रियतेसाठी, साहित्याचा बाजार मांडून बसणारे दुकानदार, पैशाचे गुलाम ?....'

चिंतू सदानंदवर ताडताड वाक्प्रहार करत सुटला होता. पण यावेळी त्याच्यासमोर केवळ सदानंद आणि त्याचं दोस्त मंडळच उरलं नव्हतं. अण्णा, त्याचे मोठे भाऊ, नातलग वगैरे जे जे कोणी त्याचा उपहास करीत असत त्या सर्वांवर तो आसूड ओढत होता. त्यांच्या पाठीची लक्तरं लोंबवीत होता. त्याचं विव्हळणं ऐकून त्याला एक आसुरी समाधान मिळत होतं. त्या समाधानाची एक वेगळीच धुंदी त्याच्या डोळ्यावर चढली होती. अन् त्या धुंदीत तो ताडताड बोलत होता. मनातला सारा असंतोष ओकून टाकत होता. सदानंद अन् त्याचं दोस्तमंडळ त्याच्या चिडून बोलण्यावर ओठातल्या ओठात हसत होते, हे त्याच्या लक्षात आलं नव्हतं. त्यांना त्याच्या वांझोट्या चिडण्याची गंमत वाटत होती. इकडे त्याचं लक्षच नव्हतं. थोडा आवेग ओसरल्यावर एका वेगळ्याच मानसिक तृप्तीत चिंतू तिथून निघाला. केसातून बोटं फिरवीत अन् एक हात जोरजोरानं हालवीत तो लांब लांब पावलं टाकू लागला.... सदानंद अन् त्याच्या मित्रांपासून त्याला दूर जायचं होतं. ह्या जमिनीवर सरपटणाऱ्या लोकांपासून अलग व्हायचं होतं. ह्यांना त्याच्या मनातला असंतोष, त्याची व्यथा कळू शकत नव्हती. त्यांची तेवढी कुवतच नव्हती.

अन् तो असा भरभर चालला असताना त्याला एकदम सिगरेट ओढण्याची अनिवार तलफ आली. त्याचे दोन्ही हात पँटच्या दोन्ही खिशात फिरून रिकामे बाहेर आले. शर्टच्या खिशात एकही पैसा नाही हे लक्षात आल्यावर त्याच्या मनाची मोठी विचित्र अवस्था झाली. सिगरेटची तलफ दबता दबत

नव्हती अन् खिशात एक पैसाही नव्हता. आलेली तलफ दाबून धरताना त्याच्या मनाला भयंकर ताण पडू लागला. रस्त्यानं कुणी मित्र दिसतो का याचा तो नजरेनं शोध घेऊ लागला.

तेवढ्यात त्याची दृष्टी त्याच्याकडे येणाऱ्या यमुना जोशीवर पडली.

काळा वर्ण, किडकिडीत बांधा, समोरचे दोन दात ओठांवर आलेले, डोळ्यांवर जाड भिंगाचा चष्मा अन् चेहऱ्यावर एक प्रकारचा भोळसट उत्साही भाव कायम असणारी यमुना जोशी त्याच्या पुढ्यात उभी राहिली अन् आपल्या किरट्या आवाजात लाडिक बोलू लागली. बऱ्याच दिवसात न भेटल्याची तक्रार करू लागली. खोटं खोटं रागावू लागली.

त्याच्याच कचेरीत नोकरीला असलेली यमुना जोशी दिसायला कुरूप अन् डोक्यानं मंदच होती. पण तिचा उत्साह इतका दांडगा होता की नोकरी करून ती सकाळच्या कॉलेजातही जात असे. बी. ए. ला तिनं मराठी साहित्य घेतलं होतं. अन् चर्चा करण्याकरिता ती चिंतूकडे येत असे. चिंतूची साहित्यावरची मतं ऐकताना तिच्या चेहऱ्यावर त्याच्याबद्दल गाढ आदर उमटत असे. अन् तो भाव चिंतूच्या अहंगंडाला कुठंतरी सुखावून जात असे. म्हणूनच तो तिला इतरांसारखं टाळत नसे. तिच्याशी तासन् तास गप्पा मारत बसत असे.

पण आज तिच्या बडबडीचा त्याला कंटाळा येऊ लागला. तिचं किरट्या आवाजातलं बोलणं त्याच्या डोक्याला भोक पाडू लागलं. तरीपण चहा घेण्यासाठी तिनं त्याला जवळच्याच हॉटेलमध्ये नेलं तेव्हा साखळीला बांधल्याप्रमाणे तो तिच्या मागून गेला. चहाच्या कपात सिगरेटची तलफ बुडविण्याची कोशीस करू लागला. एकदा यमुनेलाच सिगरेटसाठी पैसे मागावे असा विचार त्याच्या मनात उसळी मारून आला. त्याला मोठ्या कष्टानं दाबून तो समोर दिसणाऱ्या पानठेल्यावर सिगरेट पीत उभ्या असलेल्या इसमाकडे टक लावून पाहू लागला. मधून मधून संभाषणात हुंकार भरू लागला.

चिंतूचं आपल्या बोलण्याकडे विशेष लक्ष नाही हे बोलण्याच्या उत्साहात यमुनेच्या बराच वेळ लक्षातच आलं नाही. अन् जेव्हा ते आलं तेव्हा मनात ती जरा खट्टूच झाली. वरवर त्याच्या मुडबद्दल कौतुकमिश्रित थट्टा करून तिनं आपलं बोलणं आवरलं, एवढ्यात वेटरनं बिलातले पैसे परत आणून डिशमध्ये ठेवले. पाच रुपयाची नोट अन् काही नाणी.

त्या नोटेकडे पाहताना चेहरा निर्विकार ठेवण्याचा प्रयत्न चिंतू करू

लागला अन् ती आपल्या पर्समध्ये टाकून यमुना उठली तेव्हा त्याला हायसं वाटलं. डिशमधील नाणी वेटरसाठी टिप् म्हणून ठेवून यमुना बाहेर पडली तेव्हा चोरट्या नजरेनं ती मोजून चिंतूही तिच्या पाठोपाठ बाहेर आला. अन् त्यावेळी त्याच्या मनात विचार आला की तेवढ्या टिपमध्येही एक सिगेटचं पाकिट आलं असतं.....

पण लगेच एका क्षुद्र व्यसनापायी आपण इतक्या खालच्या पातळीवर आलेलो पाहून त्याला शरम वाटली. स्वत:चा धिक्कार करीत, यमुना आपल्या वाटेनं निघून गेल्यावर तो परत साहित्यसंघात जाण्यासाठी वळला. मनावर पडलेला ताण अधिकच वाढू लागला.

एवढ्यात एखाद्या कुत्र्याच्या पिल्लाची मानगूट धरावी तशी त्याची मानगूट एका पोलादी पंजानं मागून पकडली. चिंतूनं मागं वळून पाहिलं. शेरुखान समोर उभा होता. त्याची चर्या उग्र दिसत होती. चिंतूनं मागं वळून पाहताच गुरगुरत तो म्हणाला –

'ओ साठे बाबू ! हमारा पेशा तो निकालो !!'

चिंतूच्या मनावर त्याच्या गुरगुरण्याचा काही एक परिणाम झाला नाही. खानाच्या बंगाली शर्टच्या बाजूच्या लोंबणाऱ्या खिशातून दिसणाऱ्या बिडीच्या बंडलाकडे आशाळभूत नजरेनं पाहात तो लाडीगोडीनं म्हणाला –

'अरे शेरूखान ! हम क्या भाग जा रहे है । मिल जायेंगे तुम्हारे सब पैसे । लेकिन पहले बिडीविडी तो पिलाओ ।'

खान जरा चमकलाच. चिंतूचं आजचं वागणं त्याला वेगळं वाटलं. नित्याप्रमाणे पैसे नसल्याची भाषा आणि थोडा अवधी देण्यासाठी गयावया तो चिंतुकडून अपेक्षित होता. पण त्याची आजची और भाषा पाहून खानाच्या डोळ्यात आशा फुलली. मोठ्या खुशीत बिडीचं बंडल त्यानं खिशातून काढलं. चिंतूनं त्यातून दोनचार विड्या काढून घेतल्यावरही काही विशेष न वाटल्यासारखं दाखवून, चिंतूनं ओठात धरलेली बिडी त्यानं स्वत: काडी उजळून पेटविली.

चिंतू जसजसा झुरके मारू लागला तसतसा त्याच्या मनावरचा ताण कमी कमी होऊ लागला अन् गॅसच्या फुग्यासारखं त्याचं मन वरवर जाऊ लागलं. त्यानं आपली नेहमीची उंची गाठली अन् त्याच क्षणी त्याला आपण मघाशी यमुनेशी अकारण तुटक वागलो ह्याची खंत वाटू लागली. त्याला अंतर्बाह्य जाणणारी नि त्याच्याबद्दल आदर बाळगणारी त्याच्या दृष्टीनं या जगात फक्त

कवि चंडोल अन् यमुनाच होती.

पण म्हणून ह्या अनुतापाच्या भावनेनं त्याच्या मनाला सर्वस्वी व्यापून टाकलं असं नाही. उलट त्याच्या ठिकाणच्या अहंगंडाला त्यामुळे फुलोराच आला. त्याची नेहमीची कलंदर वृत्ती जागी झाली अन् अर्धवट जुळवलेल्या कवितेच्या काही ओळी तो पुन्हा मनात घोळवू लागला. खानाचं अस्तित्वच तो काहीकाळ विसरून गेला.

पण खान काही त्याला विसरला नव्हता. त्यानं काही वेळ वाट पाहिली. चिंतू आपणहून पैशाची गोष्ट काढीना तेव्हा त्यानं पुन्हा पैशांची मागणी केली. भानावर येऊन चिंतूनं बेफिकीर जबाब दिला, 'आयेंगे तब दे देंगे । अब तो अपने पास फुटी कवडी भी नही ।'

अन् जणू काय दिलेले उत्तर पुरेसे आहे अशा थाटात तो फकाफक झुरके घेऊ लागला.

शेरूखानची सहनशक्ती संपली. संतापानं बेभान होऊन तो चिंतूला अद्वातद्वा शिव्या देऊ लागला. आईमाईचा उद्धार करू लागला. धमक्या देऊ लागला. ओरडूनओरडून त्यानं रस्त्यावरचे लोक गोळा केले अन् त्यांना सारं सांगू लागला. आज पैसे न मिळाल्यास खुनाची धमकी देऊ लागला. शेवटी कशानंच चिंतू तोंड उघडत नाही हे पाहून आता तो त्याच्या अंगावर धावून जाणार एवढ्यात कुणीतरी मागून त्याचं बकोट पकडलं अन् जरब असलेल्या आवाजात म्हणालं –

'ठैरो ! कितना रुपैया है तुम्हारा !'

खानानं मागं वळून पाहिलं. अधूनमधून पिकलेल्या कुरळ्या केसाच्या, उंच भालप्रदेशाच्या, भेदक घाऱ्या डोळ्यांच्या नि भरदार देहयष्टीच्या एका करारी गृहस्थाला पाहून तो जरा वरमलाच. चिंतूनं आवाजावरूनच 'युगांतरा'चे संपादक पांडुरंगराव उर्फ गजाभाऊ सोहनी यांना ओळखलं, पण त्यांची नजर टाळून मख्ख चेहऱ्यानं तो दुसरीकडे पाहू लागला – उंचावर एका चमकणाऱ्या लाल निळ्या जाहिरातीकडे –

खानानं क्षण दोन क्षण गजाभाऊंची मुद्रा न्याहाळली. मग एकदम स्वरात नरमाई आणून तो चिंतूची त्यांच्याजवळ तक्रार करू लागला. त्यानं पैसे कर्जाऊ घेतल्यापासून वर्षभर कसं झुलवलं अन् अजून एक पैसाही कसा फेडला नाही याचा तपशील देऊ लागला. पण गजाभाउंनी त्याला मध्येच तोडून विचारलं,

''फालतू बकवास बंद करो ! कितना रुपैया है तुम्हारा ? सूद का मिलाके एकसाथ बताओ !'

खानाचे डोळे आशेनं चमकले. त्यानं जरा मोठाच आकडा सांगितला. गजाभाऊंनी लगेच त्याला तितके पैसे देऊन हाकललं अन् गर्दीला उद्देशून त्यांनी धमकावलं,

'चला ! निघा येथून !! इथं काय तमाशा चालू आहे ? गर्दी करायला ?' अन् चिंतूचा हात पकडून ते गर्दीचं कडं फोडून बाहेर पडले. रस्त्यानं चालू लागले.

खानाच्या तावडीतून सहिसलामत सोडविल्याबद्दल चिंतूला विशेष काही वाटल्याचं गजाभाऊंना त्याच्या चेहऱ्यावरून दिसलं नाही तरीपण आपण वेळेवर केलेल्या मदतीमुळे अन् चौघात झालेल्या बेअब्रुनं ओशाळून तो मूक झाला असावा असं त्यांनी गृहित धरलं आणि हीच वेळ त्याला, त्याच्या भल्याची सांगण्यासाठी योग्य वेळ आहे असं वाटल्यानं त्यांनी प्रथम सहज स्वरात विचारलं, 'कुठं निघाला आहेस ? साहित्यसंघातच ना ? चंडोलाच्या सत्कारसभेला ? ठीक ! मीही तिकडेच निघालो आहे. बरोबरच जाऊ. पण आधी जरा चहा मारू, ये !' अन् ते त्याच्यासह जवळच्याच हॉटेलात शिरले.

चिंतूचा अन् गजाभाऊंचा संबंध केवळ एक कवि नि एक संपादक इतक्या पुरता मर्यादित नव्हता. गजाभाऊ वयानं जरी चिंतूपेक्षा बरेच वडील असले तरी चिंतूशी वागताना ते मित्रत्वाच्या नात्यानेच वागत. कधी कधी जरी ते विषयानुरुप वडिलकीच्या नात्यानं बोलत तरी बहुधा समान भूमिकेतूनच चर्चा करीत. चिंतूच्या वडिलांशी, अण्णांशी त्यांचा जुना स्नेह होता. म्हणून त्यांना त्या कुटुंबाबद्दल जिव्हाळा वाटत होता; प्रेम वाटत होतं.

आणि त्यातल्या त्यात चिंतूबद्दल त्यांना विशेष ममत्व वाटण्याचं कारण एकतर त्याचे दोन्ही मोठे भाऊ आपापल्या व्यवसायात मोठं नाव मिळवून सुस्थितीत जगत होते. त्यांना कुणाच्या सहानुभूतीची गरजही नव्हती. तसं चिंतूचं नव्हतं. शिवाय संपादक ह्या नात्यानं त्यांचा चिंतूशी जास्त संबंध आल्याने ते चिंतूची व्यथा ओळखू शकत होते. काव्याच्या क्षेत्रात एक महान कामगिरी करायची अन् त्यासाठी वाटेल ते दिव्य, पडेल तो त्याग करायची चिंतूची तयारी होती. म्हणूनच इंटर नंतर, .... पोटार्थाचे साधन म्हणून त्यानं एक लहानशी सरकारी नोकरी पत्करली होती. आपल्या क्षेत्रात भरपूर परिश्रम करायला वेळ

मिळावा म्हणून.....! सुखासीन जीवन आपल्या प्रतिभेला कदाचित मारक ठरेल, ध्येयाच्या मार्गातील अडथळा होऊन बसेल अशी त्याची ठाम समजूत होऊन बसली होती. म्हणून तो पुढं शिकायलाही तयार नव्हता किंवा खात्याच्या परिक्षाहि द्यायला तयार नव्हता.... चंडोलांचा आदर्श त्यानं आपल्यासमोर ठेवला होता.

पण त्याच्या प्रतिभेची झेप खरोखरच एवढी सामर्थ्यशाली नव्हती - जेवढी त्यानं आपली कल्पना करून घेतली होती. हे सत्य, संपादक ह्या नात्यानं गजाभाऊंना आधीच कळून आलं होतं आणि ही नाजूक गोष्ट चिंतूला न दुखावता कशी समजावून सांगावी हा त्यांच्यापुढे बऱ्याच दिवसांपासून प्रश्न होता. ह्या अजाण, भोळ्या तरुणाचं सारं सारं आयुष्य असं त्रिशंकूसारखं जाणारं की काय या आशंकेनं कधीकधी त्यांच्या पोटात तुटू लागे. आजच्या प्रसंगानं तर गजाभाऊंना मनातून हलवून सोडलं. अण्णांच्या ह्या वाया चाललेल्या मुलाच्या बाबतीत त्याचं काही कर्तव्य आहे असं त्यांना वाटू लागलं अन् म्हणून चहाचा कप रिकामा केल्यावर एक सिगरेट चिंतुला ऑफर करीत नि एक स्वत: पेटवीत ते म्हणाले –

'चिंतामण ! हे असं किती दिवस चालायचं ?'

'काय ?' चिंतूनं सिगरेट पेटवीत विचारलं.

'तुला कळलंय मला काय विचारायचंय ते !' गजाभाऊचा तीव्र स्वर.

'असंच चालणार ! पैसाच पुरत नाही.' चिंतुचा स्वर कडवट.

'अजून कुणाचं काही कर्ज ?' गजाभाऊ जपून एकएक विचारू लागले. त्याच्या भावना न दुखावता.

'आहे एक दोन पठाणांचं !' चिंतुच्या स्वरात बेफिकिरी.

'वडील भावाची काही मदत ?'

'मुंबईला असल्यानं त्याचं त्यांना झेपेनासं झालंय असं त्याचं म्हणणं! शिवाय त्यांना आपला सामाजिक दर्जा सांभाळावा लागतो.' चिंतु उपरोधिकपणे म्हणतो.

'अण्णांच्या पेन्शनची मदत होत असेल.'

'बायकोला ! संसार चालवण्यासाठी.' धुराचा एक भपकारा नाकातोंडातून काढत चिंतू हसला.

'अस्सं ! म्हणजे घरातली सारी सूत्रं, खर्चाची वगैरे....'

'गृहदेवतेच्या हाती !' चिंतूनं वाक्य पूर्ण केलं.

'मग हे कर्ज ?' गजाभाऊंना आता थोडी कल्पना आलेली असते.

'पगारातून आमच्या वाट्याला जो भाग स्वखर्चाला येतो तो पुरत नाही म्हणून.... माझी चहा, सिगरेट, पुस्तकं इत्यादींची व्यसनं घरात पसंत नाहीत.'

'तुझा पगार पुरत नसेल रे ! म्हणून कदाचित --'

'तुम्ही आमच्या बायकोला ओळखत नाही' चिंतू परत हसून म्हणाला, 'अगदी अण्णांच्या पावलावर पाऊल !'

'गरीब दिसते बिचारी ! सर्वांचं समजून करते.'

'हो ना ! फक्त मलाच समजून घेत नाही.'

'काय म्हणते ?'

'तेच ! जे अण्णा रात्रंदिवस घोकत असतात. एकतर मोठी पदवी मिळवून दुसरी चांगली नोकरी मिळव किंवा आहे त्याच खात्याच्या परीक्षा देऊन वरची जागा मिळव ! अहोरात्र एकच जप !!' चिंतू वैतागून म्हणाला.

'चिंतामण ! आज मलाही तुला जरा हेच सांगायचं आहे. जिवाभावाचा मित्र म्हणून. वडिलकीचा आव आणून नव्हे...' गजाभाऊ थांबले. चिंतूचं आपल्याकडे लक्ष आहे असं पाहून ते पुढं म्हणाले.

'मी तुला ओळखतो. तुझं मन, तुझं ध्येय याची मला पूर्ण ओळख आहे ! पण मला तुझी होत असलेली मानहानी, कुतरओढ, कुचंबणा पाहवत नाही, म्हणून तुला चार गोष्टी सांगाव्याशा वाटतात. पाहा पटलं तर...' गजाभाऊंनी एक मोठा झुरका मारला. काही वेळ ते स्तब्ध बसले. नंतर चुटकीनं राख झाडत म्हणाले -

'चिंतामण ! तू हुशार आहेस. ज्या विषयात तू लक्ष घालतोस त्याचा तू तळापासून ठाव घ्यायचा प्रयत्न करतोस. मग तू हे असलं मानहानीचं तिरस्कृत जीवन का जगतोस ? अण्णा म्हणतात त्याप्रमाणे जरा एक दोन वर्ष मेहनत कर, एकदा तू मोठा ऑफिसर झाला की मग सारं आयुष्यच आहे आवडीचा व्यासंग चालू ठेवायला. काय ? एवढी तडजोड तू करू शकणार नाहीस ?.... अरे ! आज गाजत असलेले कित्येक साहित्यिक प्रथम आपापल्या आयुष्याची नीट घडी बसवून असलेले आढळतील. तुझे ते आदर्श कवि चंडोलसुद्धा --

केवळ आपल्या गाढ व्यासंगानं, मोठ्या पदवीचं शेपूट न लावता नाव

कमावून आहेत. महाराष्ट्र सरकारच्या भाषा विभागात केवळ गुणांवर 'गॅझेटेड ऑफिसर' झाले आहेत. ह्या वर्षीतर त्यांना त्यांच्या साहित्यिक कामगिरीबद्दल पद्मश्री मिळालेली आहे.

'गजाभाऊ ! दारिद्र्याला भिऊन तडजोड करणारे लेखक साहित्यक्षेत्रात कधीच अमर झालेले नाहीत, होणार नाहीत. इंग्लिश कवी गोल्डस्मिथ, थॉमस ग्रे किंवा आपल्याकडील केशवसुत, चंद्रशेखर, गालिब इत्यादिंचं जीवन कसं गेलं तुम्हाला माहीतच आहे. रशियन कादंबरीकार डोस्टोव्हस्कीवर तर त्याच्या आयुष्यात डोईजड कर्ज झालं होतं ! तरी ह्या साहित्यिकांनी काही तडजोड केलेली दिसत नाही आपल्या जीवनात ! वास्तव जीवनाची त्यांची अनुभूती म्हणूनच बावनकशी ठरली. त्याचं साहित्य अमर झालं. गरिबी हे आज साऱ्या मानवजातीचंच दुखणं होऊन बसलंय. तिला भिऊन पळणं स्वत:च्या जीवनात किंवा साहित्यात, भेकडपणाचं, नामर्दीचं लक्षण आहे. अन् असा पलायनवादी मी तरी नव्हे.' चिंतूचा चेहरा आवेशानं तटतटला होता, त्याच्या डोळ्यात वेगळीच चमक आलेली होती. सिगरेटचे झुरके घेत तो काही वेळ आपल्याच विचारात गुंगला. ती संधी साधून गजाभाऊंनी आपलं घोडं दामटलं. ते म्हणाले-

'पण तू ज्याच्या पावलावर पाऊल टाकून मोठं व्हायचं ठरवलंस ते कवि चंडोलसुद्धा प्रत्यक्षात कसे आहेत –'

'ते मला पूर्ण माहीत आहे.' चिंतुनं त्यांना मध्येच तोडलं. तो पुढे म्हणाला, 'गजाभाऊ ! माझ्या लक्षात आलंय तुम्हाला काय म्हणायचं ते. गजानन बाकरेच्या वशिलानं त्यांना पद्मश्री मिळाली हेच तुम्हाला सांगायचंय ना ? ही अफवा माझ्याही कानावर आलेली आहे. पण माझा त्यावर मुळीच विश्वास नाही. चार वर्षांपूर्वी 'गॅझेटेड ऑफिसरची' जागा त्यांना मिळाली तेव्हाही त्यांच्याविरुद्ध असंच काहूर त्यांच्या हितशत्रूंनी माजवलं होतं. त्यावेळीही ह्या बाकरेचं नाव त्यांच्या बढतीशी जोडलं गेलं होतं. कारण काय ? तर हा गजानन बाकरे, ह्याची टोपी त्याच्या डोक्यात घालणारा, मढ्याच्या टाळूवरचं लोणी सफाईनं काढून घेण्यास कमी न करणारा, अनेक खटपटी लटपटी करून स्वत: सफाईनं नामानिराळा राहणारा अन् यावर्षी पार्लमेंटवर निवडून आलेला, कधीकधी चंडोलाबरोबर दिसतो. त्यांच्याशी मित्रत्वाच्या नात्यानं बोलतो. बस्स ! लोकांना एवढं निमित्त पुरं असतं अफवा पसरावयाला. पण खरं विचाराल तर चंडोलांचं बाकरेविषयीचं मत फार वाईट आहे हे मी त्यांच्या खाजगी बैठकीतला एक ह्या

नात्यानं छातीवर हात ठेवून सांगू शकतो. त्यांच्या खाजगी बैठकीत आम्ही बाकरेला कधीच पाहिलं नाही. जाऊ द्या ! चला !! समारंभाची वेळ होत आली. सिगरेटचं थोटुक विझवून फेकत चिंतू उठला. गजाभाऊंनी चहाचं बील दिलं अन् ते चिंतूबरोबर हॉटेलबाहेर पडले. नेहमीप्रमाणेच ते चिंतूला काही पटवून देण्यास असमर्थ ठरले.

ते दोघे साहित्यसंघात जाऊन पोहोचले तेव्हा त्यांना थोडा उशीरच झाला होता. रंगमंदिराचा हॉल स्त्री–पुरुषांनी गच्च भरला होता. व्यासपीठावर सत्कार समारंभ सुरू झाला होता. गजाभाऊ संपादक ह्या नात्यानं लगेच व्यासपीठावरील एका खुर्चीत बसले अन् चिंतू आपल्या नंबराच्या खुर्चीत बसला.

व्यासपीठावर कवि चंडोल सस्मित वदनानं बसले होते. त्यांच्या मुद्रेवर बुद्धिमत्तेचं पवित्र तेज विलसत होतं. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. आजुबाजूच्या खुर्च्यांवर निरनिराळ्या क्षेत्रातील मातब्बर व्यक्ती विराजमान झालेल्या दिसत होत्या. मायक्रोफोनसमोर उभे राहून स्थानिक लोकप्रिय दैनिकाचे संपादक भाषण देत होते. सारं रंगमंदिर, एकचित्तानं भाषण ऐकत होतं.

मधूनमधून हास्याची खसखस पिकत होती. मधूनच टाळ्यांचा कडकडाट होत होता. प्रत्येक वक्ता चंडोलांच्या अभिनंदनपर भाषणात एक मुद्दा प्रामुख्यानं मांडत होता. अन् तो म्हणजे त्यांनी अत्यंत विपन्नावस्थेत सुद्धा व्यासंग कसा चालू ठेवला, कसल्याही व्यावहारिक प्रलोभनाला बळी न पडता आपल्या साहित्याद्वारे समाजाच्या विविध समस्या वाचकासमोर मांडण्याचे, समाजाला जागृत करण्याचे, संदेश देण्याचे, मार्ग दाखविण्याचे कार्य निरलसपणे करून जी समाजसेवा केली त्याचं ऋण त्यांना पद्मश्री देऊनही फिटायचं नाही. हे सांगताना प्रत्येक वक्त्यानं त्यांनी सोसलेल्या दारिद्र्याच्या चटक्यांच्या नि फटक्यांच्या अनेक आठवणी श्रोत्यांना सांगितल्या अन् त्या त्या वेळी साऱ्यांच्या डोळ्यात पाणी आलं होतं.

चिंतू ह्या समारंभात स्वतःला पूर्ण हरवून बसला. कित्येकदा त्याच्या अंगावर हर्षाचे रोमांच आले तर कित्येकदा त्याच्या डोळ्यात पाणी आलं. कवि चंडोलांचा तो गौरव पाहून भक्तिभावानं त्याची छाती भरून आली. आपला आज होणारा उपहास, मानहानी, पैशाअभावी होणारी कुचंबणा साऱ्या साऱ्यांचं प्रतिबिंब त्याला चंडोलाच्या पूर्वायुष्यात दिसून आलं. अन् स्वतःला त्यांच्या

ठिकाणी कल्पून, आपला भविष्यात होऊ शकणाऱ्या अशाच सन्मानाच्या स्वप्नरंजनात तो गुंग झाला. त्या गौरवाच्या प्रसंगाची चित्र कल्पनेनं पाहण्यात स्वत:ला हरवून बसला. आज संध्याकाळपासून त्याच्या मनावर झालेल्या दु:खद आघातांच्या जखमांचा ह्या स्वप्नरंजनानं मागमूस ठेवला नाही....

सारं सभागृह दणाणून सोडणाऱ्या टाळ्यांच्या गजरानं चिंतू भानावर आला. त्यानं व्यासपीठावर पाहिलं की चंडोल आभाराचं भाषण द्यायला उठले होते. त्यांनी प्रथम हात जोडून श्रोत्यांना अभिवादन केलं आणि नंतर आपल्या स्वच्छ, मधूर आवाजात ते भाषण देऊ लागले. चिंतूला त्यांचे विचार, मतं, श्रद्धा इत्यादींची आधीच ओळख होती. तरी तो त्याचं भाषण आदरानं ऐकू लागला. त्यातला विनय त्याला आकर्षून गेला. पद्मश्रीच्या बहुमानापेक्षा आपल्या लहानशा कामाबद्दल जाणकार रसिकांनी केलेल्या कौतुकाची नि मान्यतेची आपल्याला जास्त कदर आहे. असं त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे तोंड वळवून सांगताच, मुख्यमंत्र्यासकट साऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. अन् चिंतूला त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला हा नवीन पैलू दिसून येऊन त्यांच्याबद्दलचा त्याचा भक्तिभाव शतश: वाढला. कार्यक्रम संपल्यावर लगेच चंडोलांच्या घरी जाऊन त्याचं स्वत: अभिनंदन करायचं असं त्यानं ठरवलं अन् तो उत्कंठेनं समारंभ संपण्याची वाट पाहू लागला.

टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात समारंभ संपला. श्रोते भराभर बाहेर पडले. साडेनऊ वाजत आले होते. चहापानाच्या वेळी एकमेकांची ओळख करून देण्याचा समारंभही झाला. काहींनी स्वाक्षऱ्याही मागितल्या. चिंतू तिथेच काही वेळ घोटाळला. पण त्याच्याकडे कुणीच लक्ष दिलं नाही. चंडोलाचंही त्या गर्दीत लक्ष गेलं नसावं कारण त्यांनीही चिंतूला ओळख दिली नाही. चहापानानंतर एका महत्त्वाच्या अपाइन्टमेंटची सबब सांगून ते लगेच बाहेर पडले अन् एकवार सर्वांना हात हलवून अभिवादन करीत त्यांनी गाडी चालू केली. चिंतू आधीच ठरविल्याप्रमाणे चंडोलाच्या घराच्या दिशेने चालू लागला.

रस्त्यानं चालत असताना चिंतू आपल्याच धुंदीत होता. चंडोलाचं घर शहरापासून थोडं दूर असलं तरी खिशात पैसे नसल्यानं रिक्षा वगैरे करण्याचा प्रश्नच नव्हता. तरी सवयीनं त्यानं खिशात हात घातला. त्याच्या हाताला मघाशी खानाकडून उपटलेल्या दोन बिड्या लागल्या. त्यातली एक जवळच्याच एका पान ठेल्यावरील दिव्यावर पेटवून तिचे मस्त झुरके घेत चिंतू रमत गमत

चालू लागला.

रस्त्यानं चालताना चिंतू नेहमीच्या जगात राहिला नव्हता. त्याचं कुठंही लक्ष नव्हतं. सवयीनं तो बरोबर चालत होता एवढंच. पण त्याचं मन अंतराळात तरंगत होतं. चंद्र-चांदण्याशी गोष्टी करीत होतं. काव्यमय स्वप्नाच्या एका वेगळ्याच दुनियेत विहरत होतं. तिथं नेहमीचं दुःख नव्हतं, मानहानी नव्हती, चिंता नव्हती, उपहास नव्हता. होता फक्त एक वर्णनीय आनंद, एक झगझगीत प्रकाश, एक असं अढळपद की जिथून त्याला कुणी ओढू शकत नव्हतं; की जिथून खालच्या सरपटणाऱ्या जगावर एक तुच्छ नजर तो टाकू शकत होता. साऱ्यांची कीव करू शकत होता; लोकांची कसंबसं जगण्यासाठी चालेली, ऊर फाडून टाकणारी धावपळ अलिप्त नजरेनं पाहू शकत होता, करमणूक करून घेऊ शकत होता.....

चंडोलाच्या सत्काराची धुंदी त्याच्याच मनावर चढली होती.

बिडीचा शेवटचा झुरका घेऊन चिंतूनं ती फेकली अन् थोडं थांबून आजूबाजूला पाहिलं. शहराच्या बाहेर, अमावस्येच्या दाट अंधारात, दिवे नसलेल्या निर्मनुष्य रस्त्यावर तो उभा होता.

चांदण्याच्या अंधुक उजेडात, आजुबाजुच्या खाणाखुणांवरून त्याच्या लक्षात आलं की चंडोलाचं घर इथून जवळच आहे. आता तो चालू लागणार इतक्यात बाजूच्या एकुलत्या एक बंगल्यातून त्याला चंडोलांचा आवाज ऐकू आल्याचा भास झाला. हा रस्ता त्याच्या पायाखालचा असल्यानं हा बंगला गजानन बाकरेचा आहे हे त्यानं लगेच ओळखलं अन् चंडोलांचं ह्या माणसाकडे कोणतं काम असावं ह्याचा मनाशीच विचार करीत तो नकळत त्या बंगल्याच्या कंपाऊंडमध्ये शिरला. जरा जवळ जाताच बाकरेच्या बैठकीच्या खोलीतून चंडोलांचं बोलणं अन् बाकरेचं रेकून हसणं त्याला स्पष्ट ऐकू आलं. बैठकीच्या खोलीची एक खिडकी बाहेरच्या बाजूनं बागेत उघडत होती. तिच्या खाली उभा राहून तो उत्सुकतेनं ऐकू लागला. खिडकीच्या पाट्या लोटलेल्या असल्यानं आतील लोकांना तो दिसू शकत नव्हता. बाहेर अर्धवट काळोख होता.

तो खिडकीच्या खाली उभा राहतो न राहतो तोच बाकरेचं मोठमोठ्यानं हसणं त्याच्या पुन्हा कानावर आलं. उत्सुकता न आवरून चिंतूनं हळूच फटीला डोळा लावला. अन् आतलं दृश्य पाहून तो स्तंभितच झाला. कवि चंडोल बाकरेच्या गळ्याभोवती एका हाताचा विळखा टाकून कोचावर बसले होते. मंद

स्मित त्यांच्या चेहऱ्यावर उमटलं होतं. समोर स्टुलवर एक व्हिस्किची अन् एक सोड्याची बाटली होती. आणि दोघांच्याही हातात व्हिस्किनं अर्धवट भरलेले ग्लास होते. बाकरे कोणत्यातरी गोष्टींवर तोंड वासून मोठमोठ्यानं हसत होता. हास्याची उबळ न आवरता आल्यानं त्याचा चेहरा लाल पडला होता. आपल्या डोळ्यांवर विश्वास न बसून चिंतूनं स्वत:ला चिमटा काढून पाहिलं.....

इतक्यात मोठ्या मुश्किलीनं हसू आवरून बाकरे बोलू लागला -

'काय बापूसाहेब ! अजून तुम्हाला शंका आहेच. तुम्हाला 'गॅझेटेड पोस्ट' मिळवून देणाऱ्या मोठमोठ्या धेंडांपाशी जबरदस्त वशिला लावून तुमच्यासाठी पद्मश्री खेचून आणणाऱ्या ह्या बाकरेबद्दल तुम्हाला अजून अविश्वास वाटतो ?.....ह्यः ह्यः ह्यः कमाल आहे !.... बस्स ! थोडं थैलीचं तोंड मोकळं सोडावं लागेल. मग ह्या नुकत्याच रिकाम्या झालेल्या डायरेक्टरच्या पदावर तुमची नियुक्ती निश्चित.... शिवाय तुम्हाला आता पद्मश्री मिळालेली ! आता तुम्हाला कोण अडवणार ? ह्यः ह्यः ह्यः मात्र डायरेक्टर झाल्यावर तेवढ्या आमच्या कामाचं लक्षात ठेवा..... हो ! नाहीतर गरज सरो वैद्य मरो असं कराल... ह्यः ह्यः ह्यः'

चिंतूच्या कानाचे पडदे फाडून बाकरेंचं बोलणं अन् हसणं आत घुसत होतं. अन् त्याच्या डोळ्यासमोर अंधार दाटू लागला होता. ज्या आधाराच्या बळावर तो वर वर चढण्याची आकांक्षा धरत होता, चांदण्याच्या चमचमणाऱ्या स्वप्नील, तरल, तेजस्वी दुनियेत विहार करण्याची स्वप्नं पाहात होता, ज्यासाठी ह्या जगातील सारा उपहास, कुचंबणा, दु:ख पचविण्याचा प्रयत्न करीत होता तो आधारच तुटला अन् त्या अंतराळातील दुनियेतून तो सरळ जमिनीवरील धुळीत उताणा पडला होता.

त्यानं वर पाहिलं - अनेक योजनं अंतरावरून चांदण्या त्याच्याकडे पाहून उपहासानं हसत होत्या.... तो तसाच परतला - कोलमडून !!!

---